दिनांक २७/०७/२०१७

सुविधा फारमिंग ॲन्ड अलाईड लिमीटेड रजिस्टर नंबर ०२३०८२- रजिस्टर ऑफीस ४०-अे प्रेमनगर लष्कर ग्वाल्हीयर (एम.पी.) इंडीया ४७४००१. मुख्य शाखा प्लॉट नंबर ८, दुसरा माळा संगम टॉवर रेल्वे ट्रॅक चे बाजुला दिव्या स्टील झोन-१ चे जवळ एम. पी. नगर भोपाल (एम.पी) चे संचालकांनी मौजा गडचिरोली स्थित मुल ते गडचिरोली रोड दरम्यान बट्टुवार काम्पलेक्स मध्ये कंपणीची शाखा स्थापन करुन अभिकर्ताचे मार्फतीने आर.डी., फिक्स डिपॉजिट, अपघाती विमा, पेन्शन अशाप्रकारच्या योजना राबवून ठेवीदारांकडून मोठया प्रमाणात रकमा गोळा करुन ठेवीदारांना कमी कालावधीत जास्त कमीशन देण्याचे आमीष दाखवून ठेवी ठेवण्यास अप्रामाणिकपणाने प्रोत्साहीत करुन ठेवींचे हितसंबंधाचे रक्षण न करता तसेच ठेवीदारांच्या ठेवीमधून ठेवीदारांचा फायदा होईल असे कोणतीही योजनेची व्यवस्था न करता नियोजनपुर्वक संगणमताने कट रचुन, समान उद्देशाकरीता कंपणी कायदयाचे पालन न करता, सदर योजना राबविण्यास सेबी ने मनाई केली असतांना सुध्दा मोठया प्रमाणात ठेवी स्वीकारुन ठेवीची मुदत पुर्ण झाली असतांना सुध्दा विश्वासाने सोपविण्यात आलेल्या रकमेचा अपहार करुन ठेवीदारांना त्यांची रक्कम परतफेड न करता स्वत:चे फायदयाकरीता वापरुन गडचिरोली येथील कंपनीचे कार्यालय बंद करुन ठेवीदारांची आर्थिक फसवणुक केली. अशा मजकुराचे ठेवीदार (फिर्यादी) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गडचिरोली येथे दिनांक २०/०७/२०१७ रोजी अपराध क्रमांक ४०५/२०१७ कलम ४२०, ४०६, ४०९, १२०(ब) ३४ भा.द.वि. सन १८६० सहकलम ३६, ७४, ७५, ४४७ द कंपनी ॲक्ट १९५६ सुधारणा सन २०१३ सहकलम ३, ४ महाराष्ट्र ठेवीदारांचा (वित्तीय संस्था मध्ये) हितसंबंधाचे अधिनियम सन १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून मा. पोलीस अधिक्षक सा़ो. गडचिरोली यांचे आदेशान्वये व त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे कडे तपासावर आहे.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने सदर कंपणीमधील ठेवीदारांना जाहिर आव्हान करण्यात येते की, ज्या-ज्या ठेवीदारांना सुविधा फारमींग ॲन्ड अलाईड प्रा. लिमीटेड या कंपणीमध्ये ठेवी स्वरुपात रकमा ठेवलेल्या आहेत त्या ठेवीदारांनी त्यांनी ज्या एजंट मार्फतीने सदर कंपणीत ठेवीच्या रकमा गुंतविलेल्या त्यासंबंधातील बॉन्ड व इतर पेड पावत्या पासबुकांसह, कंपणीचे आय.डी. फार्म व इतर संबंधीत दस्तऐवजांसह स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे हजर होवून माहिती दयावी. जेणेकरुन सदर कंपणीच्या आर्थिक फसवणुकीच्या व्याप्तीसंबंधात तपास करणे सोयीचे होईल.

**1संपर्काचा क्रमांक:- ऑफिस फोन नं. ०७१३२-२२३१७४**